MHOS070031512023

## नि.दि.मु.क्रं. ८१२/२०२३ मधील निशाणी ११ वरील आदेश

१. प्रस्तूतचा अर्ज त्रयस्थ पक्षकार नामे बशीरा राजेशा मकानदार यांनी त्यांना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश–१, नियम–१० प्रमाणे जादा प्रतिवादी सामील करून घेण्यासाठी केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन असे आहे की, प्रस्तुत दावा हा वादी व प्रतिवादी यांनी संगनमताने दाखल केलेला असुन दावा मिळकतीशी त्यांचा काहीही हक्कसंबंध नाही. दावा मिळकतीवर अर्जदार व मयत राजेशा मकानदार यांचे अन्य वारस यांचा मालकी व कब्जा आहे. असे असतांना प्रस्तुत दावा तोडजोडीने निकाली काढून खोटा पुरावा व कौर्ट डिक्रीचा गैरवापर करण्याचे उद्देशाने दाखल केला आहे. दावा मिळकतीबाबत अन्य न्यायालयात प्रकरणे अद्याप न्यायप्रविष्ठ असुन सर्व माहिती लपवुन वादी व प्रतिवादींनी हा दावा दाखल केला आहे. दावा मिळकती बाबत मा. जिल्हा नयायालय, उमरगा येथे दिवाणी अपील क्र. ६/२०२२ अद्याप प्रलंबीत आहे. दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यास प्रतिवादीचे नांव मंडळअधिकारी यांनी गैरमार्गाने लावले आहे. त्याबाबत उपविभागीय अधिकारी, उमरगा यांचेकडे अपीलही

न्यायप्रविष्ट आहे. अर्जदार बशीरा मकानदार, महेबुब मकानदार, अब्दुल मकानदार, अमीर मकानदार व मालन शेखे हे दावा मिळक्तीचे मालक व कब्जेदार आहेत. त्यामुळे अर्जदारास दाव्यात प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्यात यावे.

३. या कामी वादीने त्यांचे म्हणणे नि.क्र. १२ वर सादर केले आहे. वादीचे असे कथन आहे की, वादीने प्रस्तुत दावा हा प्रतिवादी विरुध्द निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी व प्रतिवादीमध्ये तडजोड होवून प्रतिवादीने वादीचा दावा मान्य करुन तडजोड पुरसीस न्यायालयात दाखल केली आहे. हरकत अर्जादार हिचा दावा मिळकतीशी कोणताही हक्क संबंध नाही किंवा मालकी कब्जा कधीही नव्हता व नाही. दावा मिळकतीचे मुळ मालक अब्दुल राजेशा मकानदार हे होते. त्यांना कोणतेही अपत्य झालेले नाही. मयत अब्दुल यांनी दावा मिळकतीचा हिबा प्रतिवादीच्या हक्कात करुन दिला होता. तेंव्हापासुन दावा मिळकतीवर प्रतिवादीचे वडीलांच्या ताब्यात दिली होती. त्यानंतर अब्दुलशा राजेशा फकीर यांनी लेखी हिब्बानामा स्टॅम्प पेपरवर करुन दावा मिळकत प्रतिवादीच्या ताब्यात दिली. परंतु, हरकत अर्जदार हे दावा मिळकतीवरील प्रतिवादीची मालकी नाकारुन हरकत अडथळे करु लागले. त्यामुळे प्रतिवादी यांनी हरकतदाराचे पती नामे राजेशा महमद मकानदार यांचे विरुध्द मालकी जाहीर होवून मिळणे व निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी याच

न्यायालयात दिवाणी दावा क्र. २१०/२०१० दाखल केला होता. सदर दावा हा साक्षी पुरावे होवून दिनांक १४/१०/२०१० रोजी डिक्री झालेला आहे. सदर डिक्री अधारे प्रतिवादीच्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या ७/१२ वर फेरफार क्र. ५०६१ अन्वये घेण्यात आली आहे. हरकत अर्जदाराचा दावा मिळकतीशी कांहीही हक्क संबंध नाही. हरकत अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा, चुकीचा आणि कोर्टाची दिशाभुल करणारा आहे. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

**४.** अर्जदार व वादी यांच्या कथनांचा विचार करता, सदरचा दावा हा प्रतिवादी यांच्या विरूध्द निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी प्रलंबित आहे. सदरचा दावा दि. १४/१२/२०२३ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश–१, नियम–१० (२) चा विचार करता न्यायालय हे दाव्याच्या कोणत्याही टप्यावर आवश्यक वाटल्यास एखाद्याला पक्षकार म्हणून सामील करू शकते किंवा आवश्यकता नसल्यास पक्षकार म्हणून कमी देखील करू शकते.

**५.** त्यामुळे या दाव्याकामी एकूण वादातील प्रश्नांना पूर्णत: निर्णयीत करण्यासाठी व दावा मिळकती विषयी असणारा संपूर्ण वाद गुणवत्तेवर व सर्वसमावेशक सुनावणी घेवून योग्य त्या निकर्षाच्या आधारे दाव्याचा वाद विषयक संपुष्टात आणण्यासाठी अर्जदार बशीरा राजेशा मकारनदार यांना प्रतिवादी क्र. २ म्हणून या

दाव्याकामी सामील केल्यास वादी व प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, वादी व प्रतिवादींना या दाव्याच्या चौकशीकामी पूर्णत: संधी देवून मगच दावा निकाली होणार आहे. त्यामुळे पूढील प्रमाणे आदेश पारीत.

**आ दे श**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार बशीरा राजेशा मकारनदार, वय ६५ वर्षे, धंदा – घरकाम, रा. आलुर, ता. उमरगा, जि. धाराशिव यांना प्रतिवादी क्र. २ म्हणून या दाव्याकामी सामील करण्यात येते.

३. वादी यांनी अर्जात नमुद केलेली दुरुस्ती पुढील १४ दिवसात करावी.

(खुल्या न्यायालयात जाहीर)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GEETA PRAVIN BANKAR
Date: 2025.01.31 13:36:55 +0530

उमरगा. (गीता प्रविण बनकर)
दिनांक – २९/०१/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,उमरगा.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Shri. A.M.Wagh, Stenographer G-III (On Deputation) |
| Court | --- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Omerga |
| Date | --- | 29/01/2025 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 29/01/2025 |
| Order uploaded on | --- | 30/01/2025 |